लोकमत

# विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची गरज

## डी. टी. शिर्के : 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनविल्यास विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठी सुद्धा ती उपयुक्त ठरतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

नवीन सीबीसीएस अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकासंदर्भात बी. एस्सी. भाग-२ साठीच्या 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. प्रशांत पाटील, चिदानंद कनमाडी, सचिन पवार आणि प्रा. विजय कोठावळे यांनी हे पुस्तक लिहिले आहे.



शिवाजी विद्यापीठात 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, रावसाहेब पुजारी, आदी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र हे पुस्तक विद्यार्थ्यांना निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सर्व महाविद्यालयांतील प्रात्यक्षिकांमध्ये समानता येईल. या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील प्रात्यक्षिकासंबंधीची भीती दूर होईल. भौतिकशास्त्र विषयाच्या चार शिक्षकांनी एकत्रित केलेले हे कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.

या कार्यक्रमास उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तेजस प्रकाशनाचे रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले. डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

### उपकरणे स्वस्तात उपलब्धतेचा प्रयत्न

या कार्यक्रमात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, भौतिकशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकांची कमतरता आणि वाढती विद्यार्थी संख्या यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनाला मर्यादा येतात आणि हा विषय कठीण वाटू लागतो. ती अडचण या पुस्तकामुळे काहीअंशी कमी होणार आहे. या पुस्तकाप्रमाणे भौतिकशास्त्र विषयाच्या प्रयोगासाठी आवश्यक उपकरणे स्वस्तामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठीही प्रयत्न सुरु आहेत.



कोल्हापूर : प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी भौतिकशास्त्रावरील पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

# सर्वच विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची गरज

## डॉ. शिर्के; भौतिकशास्त्र पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १७ : विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनविल्यास विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठीसुद्धा ती उपयुक्त ठरतील,' असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकासंदर्भात बी.एस्सी.साठीच्या प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते आज झाले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. प्रशांत पाटील, डॉ. चिदानंद कनमाडी, डॉ. सचिन पवार आणि प्रा. विजय कोठावळे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, ''प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र हे पुस्तक विद्यार्थ्यांना निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सर्व महाविद्यालयांतील प्रात्यक्षिकांमध्ये समानता येईल. तसेच या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील प्रात्यक्षिकासंबंधीची भीती दूर होईल. भौतिकशास्त्र विषयाच्या चार शिक्षकांनी एकत्रित केलेले हे कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.''

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''भौतिकशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकांची कमतरता आणि वाढती विद्यार्थिसंख्या यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनाला मर्यादा येतात आणि हा विषय कठीण वाटू लागतो. ती अडचण या पुस्तकामुळे काही अंशी कमी होणार आहे.'' उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तेजस प्रकाशनाचे रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

# विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची गरज : डॉ. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनवल्यास विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठीसुद्धा ती उपयुक्त ठरतील, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सीबीसीएस अभ्यासक्रमानुसार निश्‍चित केलेल्या प्रात्यक्षिकासंदर्भात बी.एस्सी. भाग- २ साठीच्या 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. डॉ. प्रशांत पाटील, डॉ. चिदानंद कनमाडी, डॉ. सचिन पवार आणि प्रा. विजय कोठावळे यांनी हे पुस्तक लिहिले आहे.



कोल्हापूर : 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

डॉ. शिर्के म्हणाले, प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र हे पुस्तक विद्यार्थ्यांना निश्‍चितच उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सर्व महाविद्यालयांतील प्रात्यक्षिकांमध्ये समानता येईल. तसेच या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील प्रात्यक्षिकासंबंधीची भीती दूर होईल. भौतिकशास्त्र विषयाच्या चार शिक्षकांनी एकत्रित केलेले हे कार्य निश्‍चितच अनुकरणीय आहे.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, भौतिकशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकांची कमतरता आणि वाढती विद्यार्थी संख्या यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनाला मर्यादा येतात आणि हा विषय कठीण वाटू लागतो. ती अडचण या पुस्तकामुळे काहीअंशी कमी होणार आहे.

यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तेजस प्रकाशनचे रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

# कोल्हापूर प्लास्टिकमुक्तीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज

## आयुक्त डॉ. कलशेट्टी; विद्यापीठात पारितोषिक वितरण समारंभ



**कोल्हापूर : ओझोन दिनानिमित्त विद्यापीठात विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. पी. डी. राऊत आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्लास्टिक हा पर्यावरणाचा खूप मोठा शत्रू असून कोल्हापूर शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मनपा आयुक्त डॉ. म ल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने आयोजित विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. कलशेट्टी यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, शासनाने ५० कोटी वृक्षलागवडीचा उपक्रम असो की स्वच्छता मोहीम असो, या साऱ्यांचा संबंध अंतिमतः पर्यावरणाशी आहे. सारे पर्यावरणीय प्रश्न हे एकमेकांशी निगडित आहेत.

यावेळी महानगरपालिका उपायुक्त संजय सरनाईक, पर्यावरण विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, प्रमोद पुंगावकर, सुरेश पाटील, राजेंद्र इंगवले उपस्थित होते.



कोल्हापूर : जागतिक ओझोन दिनानिमित्ताने आयोजित स्पर्धांच्या पारितोषिक वितरणप्रसंगी विद्यार्थ्यांना गौरविताना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी.

# प्लास्टिकमुक्तीसाठी एकत्रित प्रयत्नांची गरज

## आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी : शिवाजी विद्यापीठात जागतिक ओझोन दिन कार्यक्रम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

प्लास्टिक हा पर्यावरणाचा खूप मोठा शत्रू असून, कोल्हापूर शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे जागतिक ओझोन दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, शासनाने ५० कोटी वृक्ष लागवडीचा उपक्रम असो की स्वच्छता मोहीम असो, या साऱ्यांचा संबंध अंतिमतः पर्यावरणाशी आहे. सारे पर्यावरणीय प्रश्न हे एकमेकांशी निगडित आहेत. त्यामुळे त्यांचे निराकरण अत्यंत सजगपणे करण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक हा यातील सर्वाधिक घातक प्रकार आहे. त्यामुळे कोल्हापूरसारख्या जागृत शहरातील नागरिकांनी प्लास्टिकमुक्तीसाठी पुढाकार घेऊन जगासमोर आपला आदर्श वस्तुपाठ निर्माण करावा.

पर्यावरणशास्त्र विभागातर्फे दरवर्षी 'ईश्री' आणि 'रास' यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यात येतो. यंदाही या निमित्त गत आठवड्यात रांगोळी, फोटोग्राफी, पोस्टर, पथनाट्य, लघुपट, निबंधलेखन आदी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यांचे पारितोषिक वितरण कलशेट्टी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी आयुक्तांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाची शपथही दिली.

कार्यक्रमाला कोल्हापूर महानगरपालिकेचे उपायुक्त संजय सरनाईक, प्रमोद पुंगावकर, सुरेश पाटील, राजेंद्र इंगवले यांच्यासह पर्यावरणप्रेमी नागरिक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

# प्लास्टिकमुक्तीसाठी एकत्रित प्रयत्नांची गरज

## मल्लिनाथ कलशेट्टी : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागात पारितोषिक वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : प्लास्टिक हा पर्यावरणाचा खूप मोठा शत्रू आहे. कोल्हापूर शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभाग, इशरे आणि रास या संस्थांतर्फे 'जागतिक ओझोन दिवस' साजरा करण्यात येतो. त्याअंतर्गत रांगोळी, फोटोग्राफी, पोस्टर, पथनाट्य, लघुपट, निबंधलेखन, आदी स्पर्धा झाल्या.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, 'शासनाने ५० कोटी वृक्षलागवडीचा उपक्रम असो, की स्वच्छता मोहीम असो, या सर्वांचा संबंध अंतिमत: पर्यावरणाशी आहे. सारे पर्यावरणीय प्रश्न हे एकमेकांशी निगडित आहेत; त्यामुळे त्यांचे निराकरण अत्यंत सजगपणे करण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक हा यातील सर्वाधिक घातक प्रकार आहे; त्यामुळे कोल्हापूरसारख्या जागृत शहरातील नागरिकांनी प्लास्टिकमुक्तीसाठी पुढाकार घेऊन जगासमोर आपला आदर्श वस्तुपाठ निर्माण करावा. रिड्यूस, रियुज, रिसायकल आणि रिफ्युज या चार मार्गांनी प्लास्टिकचे निवारण आणि पर्यावरण रक्षण करता येणे शक्य आहे. कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाची शपथ दिली. यावेळी उपायुक्त संजय सरनाईक, प्रमोद पुंगावकर, सुरेश पाटील, राजेंद्र इंगवले उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागात 'जागतिक ओझोन दिना'निमित्त आयोजित विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यातील विजेत्यांना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी शेजारी सुरेश पाटील, संजय सरनाईक, पी. डी. राऊत, आसावरी जाधव, आदी उपस्थित होते.

# ‘सर्वच विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची आवश्यकता’

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनविल्यास ते विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकांसंदर्भात बी.एस्सी. भाग-२ साठीच्या ‘प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र’ पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

# विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव आजपासून

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातर्फे यंदाचा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव बुधवारी (ता. १८ सप्टेंबर) जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग येथे रंगणार आहे. विद्यापीठ व विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने होणाऱ्या या महोत्सवात कोल्हापूर

## जिल्ह्यातील १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग

जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ५६ कॉलेजांमधील १२०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

सकाळी साडेनऊ वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांच्या हस्ते महोत्त्सवाचे उदघाटन होणार आहे. आमदार डॉ. सुजित मिणचेकर व विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी प्रमुख उपस्थित आहेत.

उदघाटन कार्यक्रमानंतर सकाळी साडेदहा वाजता महोत्सवातील सांस्कृतिक स्पर्धांना सुरूवात होईल. महोत्सवाच्या मुख्य सभामंडपात सकाळी साडेदहा वाजता लोकसंगीत वाद्यवृंदाने महोत्सवाचा पडदा उघडणार आहे. तर दुपारी एक ते रात्री आठपर्यंत लोककला व लोकनृत्यांचा माहोल रंगणार आहे. संस्थेच्या ड्रॉइंग हॉलमध्ये सकाळी अकरा वाजता लघुनाटिकांचा मंच रंगणार असून दुपारी एक वाजता मूकनाट्यातून सकस अभिनयाची कसोटी लागणार आहे. दुपारी तीन ते पाच यावेळेत नकलाकार विद्यार्थ्यांच्या कला पाहण्याची संधी मिळणार आहे.

सकाळी ११ ते १ या कालावधीत हिंदी वक्तृत्व, मराठी वक्तृत्व स्पर्धा होणार असून याचवेळी सेमिनार हॉलमध्ये सुगमगायनाचे सूर घुमणार आहेत. भारतीय समूहगान स्पर्धा दुपारी २ वाजल्यापासून सुरू होणार आहे. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा सकाळी ११ वाजता होणार आहे तर दुपारी १ ते ४ यावेळेत वादविवाद स्पर्धा होणार आहे. सिद्धीविनायक ट्रस्ट हॉलमध्ये सकाळी ११ ते रात्री ८ वाजेतर्यंत विविध विषयांवरील एकांकिका स्पर्धा होणार आहे. तर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजच्या मैदानावर पथनाट्यातून सामाजिक प्रबोधनाचा जागर केला जाणार आहे.

पुढारी

# डॉ. सपकाळ, डॉ. वाघमारे यांचे शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त गुरुवारी (दि. १९) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृह येथे मुंबई विद्यापीठाचे प्रा. डॉ. अनिल सपकाळ व राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगावीचे प्रा. डॉ. चद्रकांत वाघमारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रा. डॉ. सपकाळ हे 'राजा ढाले यांचे मराठी साहित्यातील योगदान' व प्रा. डॉ. वाघमारे हे 'मराठी व कन्नड साहित्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एस. एस. महाजन व मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

# पीएचडीसाठी ३४८७ अर्ज

## प्रवेशप्रक्रिया आजपासून; एकूण ७०३ जागा

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनाचा टक्का येत्या काही वर्षांत वाढणार आहे. पीएचडी पदवीसाठी यंदा आलेल्या ३४८७ अर्जांपैकी सर्वाधिक अर्ज विज्ञान व तंत्रज्ञान विषयातील विद्यार्थ्यांचे आहेत. सामाजिक शास्त्र व भाषा या विषयांच्या तुलनेत अभियांत्रिकी, शास्त्र, वस्त्रोद्योग, नॅनोसायन्स, संख्याशास्त्र याविषयातील संशोधनाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याचे या प्रवेशअर्जांवरून स्पष्ट होत आहे.

शिवाजी विद्यीठातील विविध ४२ विषयांच्या एम. फिल., पीएचडी प्रवेशप्रक्रिया बुधवारी (ता. १८) पासून सुरू होणार आहे. २० सप्टेंबरपर्यंत कोल्हापूर, सांगली व सातारा येथील केंद्रावर ऑफलाइन पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. यंदा पीएचडीच्या ७०३ जागांसाठी तीन हजार ४८७ अर्ज आले असून एम. फिलच्या १८८ जागांसाठी १०२ अर्ज दाखल झाले आहेत. पीएचडी व एम.फिल. या दोन्ही प्रवेशपरीक्षेसाठी



अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९४१ असून एकूण ४५३० विद्यार्थी एम.फिल. व पीएचडी पदवीसाठी प्रवेशपरीक्षा देणार आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान या विषयातील संशोधनाला भविष्यात स्टार्टअप, कौशल्य विकास या संकल्पनेच्या आधारे निर्माण होणाऱ्या रोजगारांमध्ये संधी असल्याने या विषयातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे. संशोधन समाजयोगी होण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रातील संशोधनातून मांडलेल्या गृहितकांवर प्रत्यक्ष काम करण्यासाठी विपुल पर्याय असल्याचे संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयांमधून अधोरेखित होत आहे.

यावर्षी पीएचडीसाठी असलेल्या ७०३ जागांसाठी पाचपट अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे पीएचडीसाठी प्रवेश मिळवणे विद्यार्थ्यांसाठी आव्हान ठरणार आहे. मात्र एम.फिल. च्या १८८ जागांसाठी ७६ अर्ज कमी आल्याने यंदा या जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.

अभियांत्रिकी विभागात इलेक्ट्रीकल, टेक्सटाइल, मेकॅनिकल, कॉम्प्युटर, केमिकल, इलेक्ट्रॉनिक या विषयातील संशोधनासाठी अर्ज आले आहेत. तंत्रज्ञान विभागातून बायो टेक्नॉलॉजी, नॅनो सायन्स, बायोकेमिस्ट्री, अॅग्रो केमिकल अँड पेस्ट कंट्रोल याविषयातील संशोधनासाठी अर्जांची संख्या लक्षणीय आहे.

शास्त्रविभागातून पर्यावरणशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, गृहशास्त्र या विषयातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांना स्वारस्य आहे. भाषाविषयात इंग्रजी, मराठी, इतिहास यातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांचा टक्का तुलनेत कमी आहे.



# निसर्गातूनच संगीताचा उद्‌गम...!

शिवाजी विद्यापीठ : संगीतातून निर्माण होणाऱ्या सूक्ष्म लहरी, या खरे तर निसर्गाच्या सान्निध्यातूनच मिळतात. निसर्ग हाच संगीताचा पहिला गुरू. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील संगीत, नाट्यशास्त्र विभागाच्या इमारतीसमोर शांत असा तलाव आहे. तलावाच्या पृष्ठभागावर वाऱ्याच्या लहरी अन्‌ वठलेल्या झाडांच्या साथीने हा नजराणा टिपला आहे, छायाचित्रकार नितीन जाधव यांनी.

लोकमत

# विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची गरज

## डी. टी. शिर्के : 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनबिल्यास विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठी सुद्धा ती उपयुक्त ठरतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

नवीन सीबीसीएस अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकासंदर्भात बी. एससी. भाग-२ साठीच्या 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. प्रशांत पाटील, चिदानंद कनमाडी, सचिन पवार आणि प्रा. विजय कोठावळे यांनी हे पुस्तक लिहिले आहे.



शिवाजी विद्यापीठात 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, रावसाहेब पुजारी, आदी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र हे पुस्तक विद्यार्थ्यांना निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सर्व महाविद्यालयांतील प्रात्यक्षिकांमध्ये समानता येईल. या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील प्रात्यक्षिकासंबंधीची भीती दूर होईल. भौतिकशास्त्र विषयाच्या चार शिक्षकांनी एकत्रित केलेले हे कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.

या कार्यक्रमास उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तेजस प्रकाशनाचे रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले. डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

### उपकरणे स्वस्तात उपलब्धतेचा प्रयत्न

या कार्यक्रमात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, भौतिकशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकांची कमतरता आणि वाढती विद्यार्थी संख्या यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनाला मर्यादा येतात आणि हा विषय कठीण वाटू लागतो. ती अडचण या पुस्तकामुळे काहीअंशी कमी होणार आहे. या पुस्तकाप्रमाणे भौतिकशास्त्र विषयाच्या प्रयोगासाठी आवश्यक उपकरणे स्वस्तामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठीही प्रयत्न सुरु आहेत.



कोल्हापूर : प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी भौतिकशास्त्रावरील पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

# सर्वच विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची गरज

## डॉ. शिर्के; भौतिकशास्त्र पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १७ : विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनविल्यास विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठीसुद्धा ती उपयुक्त ठरतील,' असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकासंदर्भात बी.एस्सी.साठीच्या प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते आज झाले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. प्रशांत पाटील, डॉ. चिदानंद कनमाडी, डॉ. सचिन पवार आणि प्रा. विजय कोठावळे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, ''प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र हे पुस्तक विद्यार्थ्यांना निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सर्व महाविद्यालयांतील प्रात्यक्षिकांमध्ये समानता येईल. तसेच या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील प्रात्यक्षिकासंबंधीची भीती दूर होईल. भौतिकशास्त्र विषयाच्या चार शिक्षकांनी एकत्रित केलेले हे कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.''

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''भौतिकशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकांची कमतरता आणि वाढती विद्यार्थिसंख्या यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनाला मर्यादा येतात आणि हा विषय कठीण वाटू लागतो. ती अडचण या पुस्तकामुळे काही अंशी कमी होणार आहे.'' उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तेजस प्रकाशनाचे रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

# विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची गरज : डॉ. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनवल्यास विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठीसुद्धा ती उपयुक्त ठरतील, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी व्यक्त केला.



कोल्हापूर : 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सीबीसीएस अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकासंदर्भात बी.एस्सी. भाग- २ साठीच्या 'प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. डॉ. प्रशांत पाटील, डॉ. चिदानंद कनमाडी, डॉ. सचिन पवार आणि प्रा. विजय कोठावळे यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

डॉ. शिर्के म्हणाले, प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र हे पुस्तक विद्यार्थ्यांना निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सर्व महाविद्यालयांतील प्रात्यक्षिकांमध्ये समानता येईल. तसेच या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील प्रात्यक्षिकासंबंधीची भीती दूर होईल. भौतिकशास्त्र विषयाच्या चार शिक्षकांनी एकत्रित केलेले हे कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, भौतिकशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकांची कमतरता आणि वाढती विद्यार्थी संख्या यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनाला मर्यादा येतात आणि हा विषय कठीण वाटू लागतो. ती अडचण या पुस्तकामुळे काहीअंशी कमी होणार आहे.

यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तेजस प्रकाशनचे रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

# कोल्हापूर प्लास्टिकमुक्तीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज

## आयुक्त डॉ. कलशेट्टी; विद्यापीठात पारितोषिक वितरण समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्लास्टिक हा पर्यावरणाचा खूप मोठा शत्रू असून कोल्हापूर शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मनपा आयुक्त डॉ. म ल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने आयोजित विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. कलशेट्टी यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, शासनाने ५० कोटी वृक्षलागवडीचा उपक्रम असो की स्वच्छता मोहीम असो, या साऱ्यांचा संबंध अंतिमतः पर्यावरणाशी आहे. सारे पर्यावरणीय प्रश्न हे एकमेकांशी निगडित आहेत.



**कोल्हापूर : ओझोन दिनानिमित्त विद्यापीठात विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. पी. डी. राऊत आदी.**

यावेळी महानगरपालिका उपायुक्त संजय सरनाईक, पर्यावरण विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, प्रमोद पुंगावकर, सुरेश पाटील, राजेंद्र इंगवले उपस्थित होते.



कोल्हापूर : जागतिक ओझोन दिनानिमित्ताने आयोजित स्पर्धांच्या पारितोषिक वितरणप्रसंगी विद्यार्थ्यांना गौरविताना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी.

# प्लास्टिकमुक्तीसाठी एकत्रित प्रयत्नांची गरज

## आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी : शिवाजी विद्यापीठात जागतिक ओझोन दिन कार्यक्रम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

प्लास्टिक हा पर्यावरणाचा खूप मोठा शत्रू असून, कोल्हापूर शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे जागतिक ओझोन दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, शासनाने ५० कोटी वृक्ष लागवडीचा उपक्रम असो की स्वच्छता मोहीम असो, या साऱ्यांचा संबंध अंतिमतः पर्यावरणाशी आहे. सारे पर्यावरणीय प्रश्न हे एकमेकांशी निगडित आहेत. त्यामुळे त्यांचे निराकरण अत्यंत सजगपणे करण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक हा यातील सर्वाधिक घातक प्रकार आहे. त्यामुळे कोल्हापूरसारख्या जागृत शहरातील नागरिकांनी प्लास्टिकमुक्तीसाठी पुढाकार घेऊन जगासमोर आपला आदर्श वस्तुपाठ निर्माण करावा.

पर्यावरणशास्त्र विभागातर्फे दरवर्षी 'ईश्री' आणि 'रास' यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यात येतो. यंदाही या निमित्त गत आठवड्यात रांगोळी, फोटोग्राफी, पोस्टर, पथनाट्य, लघुपट, निबंधलेखन आदी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यांचे पारितोषिक वितरण कलशेट्टी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी आयुक्तांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाची शपथही दिली.

कार्यक्रमाला कोल्हापूर महानगरपालिकेचे उपायुक्त संजय सरनाईक, प्रमोद पुंगावकर, सुरेश पाटील, राजेंद्र इंगवले यांच्यासह पर्यावरणप्रेमी नागरिक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

# प्लास्टिकमुक्तीसाठी एकत्रित प्रयत्नांची गरज

## मल्लिनाथ कलशेट्टी : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागात पारितोषिक वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : प्लास्टिक हा पर्यावरणाचा खूप मोठा शत्रू आहे. कोल्हापूर शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभाग, इशरे आणि रास या संस्थांतर्फे 'जागतिक ओझोन दिवस' साजरा करण्यात येतो. त्याअंतर्गत रांगोळी, फोटोग्राफी, पोस्टर, पथनाट्य, लघुपट, निबंधलेखन, आदी स्पर्धा झाल्या.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, 'शासनाने ५० कोटी वृक्षलागवडीचा उपक्रम असो, की स्वच्छता मोहीम असो, या सर्वांचा संबंध अंतिमत: पर्यावरणाशी आहे. सारे पर्यावरणीय प्रश्न हे एकमेकांशी निगडित आहेत; त्यामुळे त्यांचे निराकरण अत्यंत सजगपणे करण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक हा यातील सर्वाधिक घातक प्रकार आहे; त्यामुळे कोल्हापूरसारख्या जागृत शहरातील नागरिकांनी प्लास्टिकमुक्तीसाठी पुढाकार घेऊन जगासमोर आपला आदर्श वस्तुपाठ निर्माण करावा. रिड्यूस, रियुज, रिसायकल आणि रिफ्युज या चार मार्गांनी प्लास्टिकचे निवारण आणि पर्यावरण रक्षण करता येणे शक्य आहे. कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाची शपथ दिली. यावेळी उपायुक्त संजय सरनाईक, प्रमोद पुंगावकर, सुरेश पाटील, राजेंद्र इंगवले उपस्थित होते.



**शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागात 'जागतिक ओझोन दिना'निमित्त आयोजित विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यातील विजेत्यांना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी शेजारी सुरेश पाटील, संजय सरनाईक, पी. डी. राऊत, आसावरी जाधव, आदी उपस्थित होते.**

# विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव आजपासून

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातर्फे यंदाचा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव बुधवारी (ता. १८ सप्टेंबर) जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग येथे रंगणार आहे. विद्यापीठ व विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने होणाऱ्या या महोत्सवात कोल्हापूर

## जिल्ह्यातील १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग

जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ५६ कॉलेजांमधील १२०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

सकाळी साडेनऊ वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांच्या हस्ते महोत्त्सवाचे उदघाटन होणार आहे. आमदार डॉ. सुजित मिणचेकर व विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी प्रमुख उपस्थित आहेत.

उदघाटन कार्यक्रमानंतर सकाळी साडेदहा वाजता महोत्सवातील सांस्कृतिक स्पर्धांना सुरूवात होईल. महोत्सवाच्या मुख्य सभामंडपात सकाळी साडेदहा वाजता लोकसंगीत वाद्यवृंदाने महोत्सवाचा पडदा उघडणार आहे. तर दुपारी एक ते रात्री आठपर्यंत लोककला व लोकनृत्यांचा माहोल रंगणार आहे. संस्थेच्या ड्रॉइंग हॉलमध्ये सकाळी अकरा वाजता लघुनाटिकांचा मंच रंगणार असून दुपारी एक वाजता मूकनाट्यातून सकस अभिनयाची कसोटी लागणार आहे. दुपारी तीन ते पाच यावेळेत नकलाकार विद्यार्थ्यांच्या कला पाहण्याची संधी मिळणार आहे.

सकाळी ११ ते १ या कालावधीत हिंदी वक्तृत्व, मराठी वक्तृत्व स्पर्धा होणार असून याचवेळी सेमिनार हॉलमध्ये सुगमगायनाचे सूर घुमणार आहेत. भारतीय समूहगान स्पर्धा दुपारी २ वाजल्यापासून सुरू होणार आहे. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा सकाळी ११ वाजता होणार आहे तर दुपारी १ ते ४ यावेळेत वादविवाद स्पर्धा होणार आहे. सिद्धीविनायक ट्रस्ट हॉलमध्ये सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत विविध विषयांवरील एकांकिका स्पर्धा होणार आहे. तर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजच्या मैदानावर पथनाट्यातून सामाजिक प्रबोधनाचा जागर केला जाणार आहे.

# पीएचडीसाठी ३४८७ अर्ज

## प्रवेशप्रक्रिया आजपासून; एकूण ७०३ जागा

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनाचा टक्का येत्या काही वर्षांत वाढणार आहे. पीएचडी पदवीसाठी यंदा आलेल्या ३४८७ अर्जांपैकी सर्वाधिक अर्ज विज्ञान व तंत्रज्ञान विषयातील विद्यार्थ्यांचे आहेत. सामाजिक शास्त्र व भाषा या विषयांच्या तुलनेत अभियांत्रिकी, शास्त्र, वस्त्रोद्योग, नॅनोसायन्स, संख्याशास्त्र याविषयातील संशोधनाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याचे या प्रवेशअर्जांवरून स्पष्ट होत आहे.

शिवाजी विद्यीठातील विविध ४२ विषयांच्या एम. फिल., पीएचडी प्रवेशप्रक्रिया बुधवारी (ता. १८) पासून सुरू होणार आहे. २० सप्टेंबरपर्यंत कोल्हापूर, सांगली व सातारा येथील केंद्रावर ऑफलाइन पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. यंदा पीएचडीच्या ७०३ जागांसाठी तीन हजार ४८७ अर्ज आले असून एम. फिलच्या १८८ जागांसाठी १०२ अर्ज दाखल झाले आहेत. पीएचडी व एम.फिल. या दोन्ही प्रवेशपरीक्षेसाठी



अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९४१ असून एकूण ४५३० विद्यार्थी एम.फिल. व पीएचडी पदवीसाठी प्रवेशपरीक्षा देणार आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान या विषयातील संशोधनाला भविष्यात स्टार्टअप, कौशल्य विकास या संकल्पनेच्या आधारे निर्माण होणाऱ्या रोजगारांमध्ये संधी असल्याने या विषयातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे. संशोधन समाजयोगी होण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रातील संशोधनातून मांडलेल्या गृहितकांवर प्रत्यक्ष काम करण्यासाठी विपुल पर्याय असल्याचे संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयांमधून अधोरेखित होत आहे.

यावर्षी पीएचडीसाठी असलेल्या ७०३ जागांसाठी पाचपट अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे पीएचडीसाठी प्रवेश मिळवणे विद्यार्थ्यांसाठी आव्हान ठरणार आहे. मात्र एम.फिल. च्या १८८ जागांसाठी ७६ अर्ज कमी आल्याने यंदा या जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.

अभियांत्रिकी विभागात इलेक्ट्रीकल, टेक्सटाइल, मेकॅनिकल, कॉम्प्युटर, केमिकल, इलेक्ट्रॉनिक या विषयातील संशोधनासाठी अर्ज आले आहेत. तंत्रज्ञान विभागातून बायो टेक्नॉलॉजी, नॅनो सायन्स, बायोकेमिस्ट्री, ॲग्रो केमिकल अँड पेस्ट कंट्रोल याविषयातील संशोधनासाठी अर्जांची संख्या लक्षणीय आहे.

शास्त्रविभागातून पर्यावरणशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, गृहशास्त्र या विषयातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांना स्वारस्य आहे. भाषाविषयात इंग्रजी, मराठी, इतिहास यातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांचा टक्का तुलनेत कमी आहे.

# ‘सर्वच विज्ञान विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तकांची आवश्यकता’

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विज्ञान शाखेतील सर्वच विषयांसाठी प्रात्यक्षिक पुस्तके बनविल्यास ते विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकांसंदर्भात बी.एस्सी. भाग-२ साठीच्या ‘प्रात्यक्षिक भौतिकशास्त्र’ पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रावसाहेब पुजारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन पवार यांनी आभार मानले.

पुढारी

# डॉ. सपकाळ, डॉ. वाघमारे यांचे शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त गुरुवारी (दि. १९) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृह येथे मुंबई विद्यापीठाचे प्रा. डॉ. अनिल सपकाळ व राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगावीचे प्रा. डॉ. चद्रकांत वाघमारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रा. डॉ. सपकाळ हे 'राजा ढाले यांचे मराठी साहित्यातील योगदान' व प्रा. डॉ. वाघमारे हे 'मराठी व कन्नड साहित्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एस. एस. महाजन व मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.



## निसर्गातूनच संगीताचा उद्‌गम...!

शिवाजी विद्यापीठ : संगीतातून निर्माण होणाऱ्या सूक्ष्म लहरी, या खरे तर निसर्गाच्या सान्निध्यातूनच मिळतात. निसर्ग हाच संगीताचा पहिला गुरू. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील संगीत, नाट्यशास्त्र विभागाच्या इमारतीसमोर शांत असा तलाव आहे. तलावाच्या पृष्ठभागावर वाऱ्याच्या लहरी अन् वठलेल्या झाडांच्या साथीने हा नजराणा टिपला आहे, छायाचित्रकार नितीन जाधव यांनी.